जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
लोकमत

# विद्यापीठाच्या भुयारी मार्गाचे आज भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्याकरिता भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्ता बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन आज शनिवारी (दि. ३) दुपारी ३ वाजता उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

0 3 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पदवी' प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा २६ मार्चपासून

## महाविद्यालयांवर जबाबदारी; विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची सूचना

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या पदवीच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या मार्च- एप्रिलमधील (उन्हाळी सत्रातील) परीक्षांची जबाबदारी संलग्नित महाविद्यालयांवर सोपविण्यात आली आहे. या परीक्षा २६ मार्च ते ३० एप्रिलदरम्यान घेण्याची सूचना विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने महाविद्यालयांना केली आहे.

पदवीस्तरावरील अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या सर्व परीक्षा, त्यांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका आयोजन आणि मूल्यमापन कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी करावयाचे आहे. त्याला विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. विद्यापीठाने निश्चित करून दिलेल्या २६ मार्च ते ३० एप्रिल या कालावधीत महाविद्यालयांनी परीक्षा घ्यावयाची आहे. त्याबाबतच्या नियम आणि कार्यपद्धती संबंधित महाविद्यालय आणि विद्यापीठातील अधिविभागांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात आली असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

### खर्चाबाबत लवकरच चर्चा

**वेळेत निकाल लावण्यासाठी पदवीच्या द्वितीय वर्षाच्या परीक्षा घेण्याची जबाबदारी विद्यापीठाने महाविद्यालयांवर सोपविली आहे. पण, ही परीक्षा घेण्यासाठी होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत विद्यापीठाकडून कमी रक्कम दिली जात असल्याची तक्रार बहुतांश महाविद्यालयांनी केली. संबंधित रक्कम वाढविण्यात यावी यासाठी शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेचा पाठपुरावा सुरू आहे. त्याबाबत चर्चा करण्यासाठी विद्यापीठ लवकरच प्राचार्यांसमवेत बैठक घेणार आहे.**

### सुमारे ९६ हजार विद्यार्थी

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात पदवी द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या २०१ आहे. त्यामध्ये बी. ए.,बी. कॉम., बी. एस्सी अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९६ हजार ७५५ इतकी आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
पुढारी

# पदवी स्तरावरील प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा २६ मार्चपासून सुरू

## शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाची मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदवी स्तरावरील अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय वर्ष अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर २६ मार्च ते ३० एप्रिल या कालावधीत होणार आहेत.

विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या सर्व परीक्षांचे (वेळापत्रक, प्रश्नपत्रिका आयोजन, परीक्षा आयोजन व मूल्यमापन) महाविद्यालय स्तरावर आयोजन करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा होणार आहेत. परीक्षा कालावधीमध्ये महाविद्यालयाने वेळापत्रक प्रसिद्ध करणे, प्रश्नपत्रिकांचे आयोजन, परीक्षा आयोजन तसेच उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करून उपलब्ध करून देण्यात आलेल्या संगणक प्रणालीमध्ये गुण भरणे ही संपूर्ण कार्यवाही करावी. परीक्षेची कार्यपद्धती व नियमावली www.unishivaji.ac.in-Exam Section - Circular या ठिकाणी उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
लोकमत

# २६ मार्चपासून प्रथम, द्वितीय वर्ष परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षा २६ मार्च ते ३० एप्रिल या कालावधीत घेण्याच्या सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सर्व महाविद्यालयांना केली आहे. वेळापत्रक, प्रश्नपत्रिका, परीक्षा व मूल्यमापन महाविद्यालय स्तरावर करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार या परीक्षा महाविद्यालय स्तरावर २६ मार्च ते ३० एप्रिल या कालावधीत घेता येणार आहेत.

0 3 FEB 2024

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांचा पुढाकार** **असोसिएशन, विद्यापीठ पातळीवर स्पर्धांचे आयोजन करता येणार**

# शिवाजी विद्यापीठात साकारणार रग्बी खेळाचे मैदान

**शिवाजी विद्यापीठात मेघनाथ नागेशकर क्रीडांगण, अत्याधुनिक सिंथेटिक ट्रॅकनंतर लवकरच रग्बीचे मैदान तयार केले जाणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी यासाठी पाऊल उचलले आहे. त्यांनी विद्यापीठात सिंथेटिक ट्रॅकनजिक जागेसह अन्य दोन जागा निवडल्या आहेत. तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य जागेवर रग्बी मैदान होणार आहे. त्यासाठी विशेष निधीचीही व्यवस्था केली जाणार आहे. रग्बी मैदान बनवण्याचे स्वप्न पाहताना कुलगुरु डॉ. शिर्के यांनी राज्यासह विद्यापीठाने रग्बी खेळात केलेल्या कामगिरीचा गांभियनि विचार केला आहे.**



**तरुण भारत संवाद**
**विशेष वृत्त**

**संग्राम काटकर**
कोल्हापूर

जागतिक पातळीवर हात व पायाने खेळला जाणारा रग्बी खेळ महाराष्ट्रामध्ये कोल्हापूरबरोबरच सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी, पुणे, मुंबई, ठाणे नाशिक, धाराशिव, नंदुरबार, नागपूर, बीड, जळगाव यासह २४ जिल्ह्यांमध्ये खेळला जातो. ज्यांच्या अंगी क्षमता, ताकत व सहनशिलता आहे, तोच हे मैदान गाजवू शकतो, असा रग्बी खेळ आहे. कोल्हापूर जिल्हा रग्बी फुटबॉल असोसिएशनचे पेट्रन-इन-चीफ मालोजीराजे छत्रपती, मधुरीमाराजे छत्रपती यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील ५ ते ७ हजार मुले-मुली रग्बीचा सराव करत आहेत. असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. अमर सासने व प्रशिक्षक दीपक पाटील यांनी रग्बीला ग्रामीण भागाने पोहोचवले आहे. कुरुकलीच्या भोगावती महाविद्यालयाचे प्रा. राहुल लहाने यांनी करवीर तालुक्यातील अनेक गावातील मुलामुलींना रग्बीकडे वळवले आहे. त्याची फलप्राप्ती म्हणून पाच-सहा वर्षात जिल्ह्यातील ११ खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये भारतीय रग्बी संघातून आणि तीनशेवर खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धामध्ये महाराष्ट्र संघातून प्रतिनिधित्व केले आहे.

ग्रामीण भागात रग्बीच्या प्रसारासाठी रग्बी असोसिएशन व भोगावती महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार झाला आहे. राज्यस्तरीय शालेय १४, १७ व १९ वर्षाखालील मुला-मुलींच्या रग्बी स्पर्धामध्ये विविध शाळांनी सुवर्णपदकांची लयलूट केली आहे. जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिह चव्हाण यांनी शिंगणापूर क्रीडा प्रशालेमध्ये रग्बी सुरू करून मुला-मुलींना रग्बीची संधी उपलब्ध केली. रग्बीचा प्रसार पाहून विद्यापीठाने २०१८ मध्ये राज्यात विद्यापीठ पातळीवर पहिला पुरुष संघ तयार केला. या संघाने २०१८ मध्ये भुवनेश्वर येथे झालेल्या अ.भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले. विद्यापीठाने २०२१ मध्ये महिला रग्बी संघ बनवला. या संघानेही गेली दोन वर्षे अ.भा.आंतरविद्यापीठ रग्बी स्पर्धेत कांस्यपदक मिळवले. मोहाली येथील चंदिगड विद्यापीठात झालेल्या आंतरविद्यापीठ महिला रग्बी स्पर्धेमध्ये सुवर्णपदक जिंकण्याची कामगिरी शिवाजी विद्यापीठ संघाने केली आहे. रग्बीची प्रगती पाहून विद्यापीठाने रग्बीचे मैदान बनवण्याचे पक्के केले आहे. त्यासाठी कुलगुरू डॉ. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे.

बालेवाडी (पुणे) व मुंबईतील बॉम्बे जिमखानाच्या धर्तीवर रग्बी मैदान बनणार आहे. या मैदानामुळे रग्बी स्पर्धाचे आयोजन करणे सोपे जाणार आहे. यातून खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये स्थान मिळवण्यासाठी राजमार्गही उपलब्ध होणार आहे. पंच म्हणूनही करिअरची संधी याच मैदानातून इच्छूकांना मिळणार आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के विद्यापीठाच्या क्रीडा विकासाकडे गांभिर्याने पाहतात. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये प्राविण्यप्राप्त खेळाडूंना मोठ्या रकमेच्या शिष्यवृती देण्याला त्यांनीच सुरुवात केली आहे. त्यांनी विद्यापीठात रग्बी मैदान बनवण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. हे मैदान कोल्हापूरच्या क्रीडा वैभवात भर घालेल, अशा पद्धतीने बनवण्याचा त्यांनी निर्धार केला आहे.

**डॉ. शरद बनसोडे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक, शिवाजी विद्यापीठ**

0 3 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅनोसायन्स'च्या तीन विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

## कस्तुरी रोकडे, संध्या घाटगे, माऊली पाटील यांचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**


कस्तुरी रोकडे


माऊली पाटील


संध्या घाटगे

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील तीन विद्यार्थिनींना संशोधनासाठी विविध विद्यापीठ, संस्थांकडून शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. त्यात कस्तुरी अशोक रोकडे (कोल्हापूर), संध्या अनिल घाटगे (सातारा), माऊली सुभाष पाटील (राधानगरी) यांचा समावेश आहे.

कस्तुरी हिची दक्षिण कोरिया येथील इन्चॉन नॅशनल विद्यापीठ येथे इनशुअर लॅब व्हिजिटिंग स्टुडंट प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली आहे. तिला दोन लाख रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळाली आहे. तिने बी. एस्सी. एम. एस्सी (एकात्मिक) नॅनोसायन्स अँन्ड टेक्नॉलॉजीची पदवी घेतली आहे. ती सध्या डॉ. टी. डी. डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. करत आहेत. एम.एस्सी भाग एकमधील संध्या हिला सीताराम जिंदाल फाउंडेशनतर्फे पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. शैक्षणिक आणि वसतिगृहाच्या खर्चासाठी तिला दरवर्षी ३३ हजार रुपये मिळणार आहेत. ही शिष्यवृत्ती दोन वर्षांसाठी आहे. बी. एस्सी.- एम. एस्सी (एकात्मिक) भाग एक मधील माऊली हिला इंडिया बुल्स फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. तिला शैक्षणिक शुल्कासाठी दरवर्षी २० हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव विलास शिंदे, प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
पुढारी

# नॅनो सायन्सच्या विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील विद्यार्थिनींना संशोधन, पदवी, पदव्युतर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. कस्तुरी रोकडे यांची दक्षिण कोरिया येथील इंन्चॉन नॅशनल विद्यापीठ येथे इनू सुपर लॅब व्हिजिटिंग स्टुडंट प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली आहे. एम.एस्सी भाग-१ मधील संध्या घाटगे सातारा यांना सीताराम जिंदाल फाऊंडेशनतर्फे पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. बी. एस्सी.- एम. एस्सी (एकात्मिक) भाग-१ मध्ये शिकणा-या माऊली पाटील (रा. येळवडे) यांना इंडिया बुल्स फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती जाहीर झाली. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू, प्रा. डॉ. पी. एस. पाटील. कुलसचिव व्ही. एन. शिंदे, अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. के. के. शर्मा यांनी यशस्वी विद्यार्थिनिंचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या एमबीए युनिटतर्फे रक्तदान शिबिर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए विभागातर्फे दि. ३० जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यत आले होते. रक्तदान शिबीराचे उद्घाटन विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी केले.

शिबिरामध्ये ७६ दात्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले. या प्रसंगी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज व छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल रक्तपेढीचे डॉ. अजय शिराळे, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे, डॉ. परशुराम देवळी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
सकाळ



कोल्हापूर : कॉलेज ऑफ कॉमर्समधील कार्यशाळेत बोलताना डॉ. विश्वनाथ मगदूम.

# कॉमर्स कॉलेजमध्ये 'आयपीआर'वर कार्यशाळा

**कोल्हापूर :** कॉलेज ऑफ कॉमर्समधील विधी विभागामार्फत शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत 'बौद्धिक मालमत्ता अधिकार' यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. कौन्सिल ऑफ एज्युकेशन संस्थेचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील अध्यक्षस्थानी होते. महावीर विद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे उपस्थित होते. डॉ. मगदूम यांनी काळानुरूप बदलत जाणाऱ्या 'आयपीआर'पासून ज्ञानार्जन करण्याचे महत्त्व सांगितले. विद्यापीठाच्या आयपीआर सेलचे संचालक प्रा. डॉ. एस. बी. सादळे यांनी 'इनोव्हेशन अँड आयपीआर' याबद्दल, विद्यापीठतील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. ए. व्ही. घुले यांनी 'ट्रेडमार्क आणि कॉपीराइट्स'वर मार्गदर्शन केले. विधी विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. देसाई यांनी संयोजन केले. सानिका पाटील, राजश्री नलवडे, रोहन माळी यांनी सूत्रसंचालन केले. प्रज्ञा कदम, सूर्यभान माणगावकर, राजेश सुतार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 FEB 2024
पुढारी

# कॉमर्स कॉलेजमध्ये स्कूल कनेक्ट कार्यशाळेत ३४९ विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये शासनाच्या स्कूल कनेक्ट (एनईपी कनेक्ट) अभियानांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या निर्देशानुसार दोन सत्रांमध्ये कार्यशाळा झाली. कार्यशाळेमध्ये १२ वीच्या ३४९ विद्यार्थ्यांचे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व त्यामुळे उच्च शिक्षणात होणाऱ्या महत्त्वपूर्ण बदलांविषयी प्रबोधन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे बदललेला अभ्यासक्रमाचा श्रेयांक आराखडा (क्रेडिट डिस्ट्रीब्युशन स्ट्रक्चर), नवे विषय, बहुविद्याशाखीय, रोजगाराभिमुख व कौशल्याधिष्ठित शिक्षण, अकॅडमिक बँक ऑफ क्रेडीट्स, मल्टिपल एन्ट्री व मल्टिपल एक्झिट याविषयी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एस. बी. राजमाने यांनी मार्गदर्शन केले. आयोजन ज्युनिअर विभागाचे विभाग प्रमुख प्रा. बी. डी. डवंग यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मगदूम यांनी केले.